वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ४८९ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०२/११/२०२०

प्रस्तावाचा विषय :- चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी हॉस्पीटल येथे शवागृह, रॅम्प, पत्रा शेड बनविणे तसेच वॉशिंग मशिन ठेवण्यासाठी फाऊंडेशन तयार करणे व ऑक्सीजन सिलेंडर करिता शॉवर बसविणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी, चंदनसार येथिल चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) कोरोनाबांधित / संशयित रुग्णांकरीता सर्व सोयीयुक्त आरोग्य केंद्र उभारणे आलेले आहे. आरोग्य केंद्र उभारणेच्या दृष्टीने सदर इमारतीमध्ये खालील प्रमाणे कामे करणे आवश्यक आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नाव
१	चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी हॉस्पीटल येथे शवागृह, रॅम्प,पत्रा शेड बनविणे तसेच वॉशिंग मशिन ठेवण्यासाठी फाऊंडेशन तयार करणे व ऑक्सीजन सिलेंडर करिता शॉवर बसविणे.	रु.५,८८,६८८/-	मे.रोहित अविनाश पाटील

ठराव :- सबब उपरोक्त ठिकाणी बांधकाम विभागामार्फत कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने कामे करावयाची असल्याने तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड, प्रकरण - ५, संविदा - २ (२) नुसार निविदा न काढता नोंदणीकृत ठेकेदाराकडून राज्य दरसूचीतील दराने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणे कामी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३९०

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :०३ /१२ /2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील चंदनसार येथील श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे डायलेसिस मशिन विनानिवीदा खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या वाढता संसर्ग लक्षात घेता सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता शासन मार्गदर्शन सुचनेनुसार नियमित डायलेसिस सेवा घेत असणाऱ्या परंतू कोव्हिड १९ संसर्ग झालेल्या रुग्णांना सेवा देणेकामी कोवीड रुग्णालयात डायलेसिस सेवा सुरु करणे आवश्यक असल्यामुळे नव्याने सुरु करण्यात आलेल्या चंदनसार येथील श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे डायलेसिस मशिन खरेदी करणे योग्य होईल.

यानुसार तुळींज रुग्णालयातील डासलेसिस विभागात मानद तत्वावर सेवा देणाऱ्या डॉ.नितीन सोनावणे, नेफ्रोलॉजिस्ट यांनी फ्रेसेनियस कंपनीचे ४००८ए या मॉडेलचे Haemodialysis Machine खरेदी करणेबाबत मे.फ्रेसेनियस मेडिकल केअर, मुंबई यांच्याकडून दरपत्रक ई-मेलद्वारे प्राप्त झाले आहेत. तसेच संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेनुसार डायलेसिस मशिन खरेदी करणेबाबत अंतीम दर प्राप्त झालेला आहे. इंडिया मार्ट या संकेतस्थळावरुन देखील मशिन दराबाबत तपशिल घेण्यात आलेला आहे. संबंधित कंपनीने मे.मेडीग्रिट इंटरप्रायझेस, ठाणे यांना अधिकृत पुरवठादार नियुक्त केल्याचे पत्र दिलेले आहे. सदर प्राप्त दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	वितरकाचे नाव	मशिनचा तपशील	सर्व करांसहीत किंमत (प्रति नग)
१	मे.मेडीग्रिट इंटरप्रायझेस	Haemodialysis Machine Model 4008A	७,८४,०००/- (५ वर्ष CMC सहीत)
२	इंडिया मार्ट		७,००,०००/- (१ वर्ष हमी कालावधी)

वरिल दरांची तुलना करुन पाहिली असता उत्पादीत कंपनी, मे.मेडीग्रिट इंटरप्रायझेस, ठाणे यांचेकडून Haemodialysis Machine Model 4008A Next Genration करिता प्राप्त दर हे ५ वर्ष CMC कालावधीसहीत आहे. त्यामुळे वरील वितरकाकडून आवश्यक असलेल्सा २ डायलेसिस मशिन हे पुढील ५ वर्षाकरीता साहीत्यासह देखभाल दुरुस्ती सेवा उपलब्ध करुन घेतल्याास भविष्यातील होणारी गैरसोय टाळता येईल. सबब वरील नमुद २ मशिन ५ वर्षाच्या CMC सह खरेदी करणेकामी होणारा खर्च खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	मशिनचा तपशील	एकूण नग	सर्व करांसहीत एकूण खर्च
१.	Haemodialysis Machine Model 4008A Next Genration	२	रु.१५,६८,०००/-
२.	CMC (साहित्यासह देखभाल दुरुस्ती) ५ वर्षाकरिता		
		एकूण	रु.१५,६८,०००/-

सदरकामी होणारा खर्च रक्कम रु.१५,६८,०००/- "रुग्णालयीन यंत्रे व इतर साधने" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी Haemodialysis Machine Model 4008A Next Genration विनानिविदा खरेदी करणेस व याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- सदरच्या उपकरणांची आवश्यकता लक्षात घेता Haemodialysis Machine Model 4008A Next Genration मे.मेडीग्रिट इंटरप्रायझेस, ठाणे यांच्याकडून विनानिविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.१५,६८,०००/- (अक्षरी- रुपये पंधरा लाख अडुसष्ट हजार मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. 401 305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - ३९३

विभाग – पाणीपुरवठा
दिनांक – 02/३१/2020

प्रस्तवाचा विषय – वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती ई कार्यालय वृंदावन गार्डन, श्रीप्रस्था येथे 7 लिटर प्रती मिनीट क्षमतेचा आर. ओ. फिल्टर, 80 लिटर क्षमतेचे वॉटर कुलर सह पुरविणे व बसविणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय वित्तीय मान्यतेसाठी सादर

प्रस्तवाचा मजकूर - वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती ई चे नविन कार्यालय श्रीप्रस्थ वृंदावन गार्डन येथे स्थलांतरीत झाले आहे. कार्यालयात पाणीपुरवठा, आरोग्य, बांधकाम, विद्यत घरपट्टी, जन्म-मृत्य, इत्यादी विभाग असुन दैनदिन कामकाजा साठी नागरीकांची ये-जा असते. तसेच प्रभागात घरपट्टी/पाणीपट्टी भरणा करणेसाठी व जन्म–मृत्यु / विवाह नोंदणी दाखले घेणेसाठी नागरीक येतात. सदर नागरीकांना व कार्यालयातील कर्मचा-यांना पाणीपुरवठाच्या फिल्टर, वॉटर कुलरची उपलब्धता नसल्याने पिण्याच्या पाण्याची अडचण जावणते. याकरीता कार्यालयात पिण्याच्या पाण्याच्या सोयीकरिता आर. ओ. फिल्टर, वॉटर कुलरची आवश्यकता आहे. यास्तव प्रभाग कार्यालयात पाणीपुरवठ्याच्या सोयीकरिता कार्यालयात नव्याने 7 लिटर प्रती मिनीट क्षमतेचा आर. ओ. फिल्टर, 80 लिटर क्षमतेचे वॉटर कुलर सह खरेदी करावा लागणार आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	कामाचे स्वरूप	अंदाजपत्रकीय रक्कम
1	वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती ई कार्यालय वृंदावन गार्डन, श्रीप्रस्था येथे 7 लिटर प्रती मिनीट क्षमतेचा आर. ओ. फिल्टर, 80 लिटर क्षमतेचे वॉटर कुलर सह पुरविणे व बसविणे	पिण्याच्या पाण्याच्या सोयीकरिता 7 लिटर प्रती मिनीट क्षमतेचा आर. ओ. फिल्टर, 80 लिटर क्षमतेचे वॉटर कुलर सह पुरविणे व बसविणे	रु.1,70,100/-

याकरीता प्रभाग समिती ई कार्यालयात करावयाच्या 2018-19 या वित्तीय वर्षाच्या सार्वजनीक बांधकाम विभागाचे अंतर्गत विद्युत विभागाकडील सी.एस.आर मधील जिल्हा सुचीनुसार आवश्यक कामाचे अंदाजपत्रके बनविणेत आली आहे.

सबब उपरोक्त प्रभाग समिती ई कार्यालय वृंदावन गार्डन, श्रीप्रस्था येथे 7 लिटर प्रती मिनीट क्षमतेचा आर. ओ. फिल्टर, 80 लिटर क्षमतेचे वॉटर कुलर सह पुरविणे व बसविणे करणेकरीता कामाच्या होणा-या रक्कम रु.1,70,100/- अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता मिळावी

ठराव – सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती ई कार्यालय वृंदावन गार्डन, श्रीप्रस्था येथे 7 लिटर प्रती मिनीट क्षमतेचा आर. ओ. फिल्टर, 80 लिटर क्षमतेचे वॉटर कुलर सह पुरविणे व बसविणे करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम 49 व 68(1), 69(1) व (2) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३९२ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :-०३ /३३/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" मधील वॉर्ड नं. ८८ मध्ये फादरवाडी येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ५,८०,७६,९०२/-
प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका)	:-	मा.महासभा वि/ ठराव क्र. १६ दि. २०/०६/२०१९
तांत्रिक मान्यता	:-	I/ ०२/११/२०१९-२० दि. १७/०६/२०१९
तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ५,८०,७६,९०२/-
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/ शअ/ बांध/७६८/ २०१९-२०
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	दि. २७/११/२०१९
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दै. नवभारत, दै. खबरे आजतक, दै. परशुराम समाचार दै. लोकमत, दै. मिड डे, दै. सकाळ, दै. इंडियन एक्सप्रेस दि. २४/१२/२०१९
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०७
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	मा. शहर अभियंता
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	दि. १३/०४/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार	:-	०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	मे. जय भवानी इंन्फ्रा.प्रोजेक्ट्	३०.००% जादा दराने
२	मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन	२७.८९% जादा दराने
३	**मे. हमिद जे. शेख**	**२५.७९% जादा दराने (वाटाघाटी अंती १०.९७ % जादा दराने)**

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता मे. हमिद जे. शेख यांच्या निविदेतील २५.७९% जादा दर हा इतर निविदा दरापेक्षा कमी आहे. सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने मा. कार्यकारी तथा शहर अभियंता यांनी जा. क्र. वविशम / बांध/ ४५७/२०२० दि. १९/१०/२०२० अन्वये मे. हमिद जे. शेख यांना वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चेसाठी निमंत्रित केले असता मे. हमिद जे. शेख दि. २०/१०/२०२० च्या पत्राने सदर वाटाघाटी अंती १०.९७% जादा दराने काम करणे शक्य असल्याचे कळविले आहे. अंदाजपत्रक हे सन २०१८-१९ च्या दरसुची नुसार बनविण्यात आले आहे. सन २०१८-१९ च्या दरसुचीतील दरांची चालु दरसुची सन २०१९-२० च्या दरांसोबत तुलना केली असता सदरचा दर हा सन २०१९-२० च्या दरसुची नुसार येणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,५१,०१,३३४/- च्या १.००% कमी असल्याचे दिसून येत आहे. मे. हमिद जे. शेख यांच्या वाटाघाटी अंती १०.९७% जादा दराच्या निविदेच्या दराबाबत मा. निविदा समितीने दि. २८/१० /२०२० रोजीच्या बैठकीत मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

मे. हमिद जे. शेख यांचा देकार योग्य व वाजवी असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार मे. हमिद जे. शेख यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- उपरोक्त कामी मे. हमिद जे. शेख यांच्या १०.९७% जादा दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मंजूरी असे.

28/10

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार

प्रशासकिय ठराव क्र. ४८३ विभाग :- आस्थापना
दिनांक :- ०३/११/२०२०

विषय :- वसई - विरार शहर महानगपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे कामी विचार विनिमय करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे कडील अधिसुचना क्र.संकिर्ण - २३०६/४१२/ प्र.क्र.२२३/२००९ दिनांक ०३/०७/२००९ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झालेली असुन ती (क) वर्गात मोडत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर तत्कालीन नगरपारिषदेतील ८०७ व तत्कालीन ग्रामपंचायती मधील ४०८ अशा एकुण १२१५ कर्मचाऱ्यांची आस्थापना आहे. तसेच महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध दि.९/९/२०१४ रोजी मंजूर झाला. त्यात २८५२ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. मंजूर पदांपैकी खालीलप्रमाणे पदांसाठी मागील वर्षी महासभा ठराव क्र.१४ दि.११/०९/२०१९ अन्वये सन २०१८-१९ मधील प्रत्यक्ष कामाचे २६५ दिवस विचारात घेऊन रु.४६/- प्रतिदिनाप्रमाणे किंवा प्रति कर्मचारी रु.१२१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी मंजूर करण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कर्मचारी तपशिल	कर्मचारी संख्या	सानुग्रह अनुदान प्रति कर्मचारी	एकूण खर्च
१	स्थायी आस्थापना	१०५०	१२१९०	१२७९९५००
२	२५६-ई फॉर्म व रोजंदारी कर्मचारी	२६	१२१९०	३१६९४०
३	NULM	५	१२१९०	६०९५०
४	क्षयरोग नियंत्रण	१७	१२१९०	२०७२३०
५	RCH	२४	१२१९०	२९२५६०
६	NUHM	४०	१२१९०	४८७६००
७	महापालिकेमार्फत कंत्राटी (६महिने)	४६७	१२१९०	५६९२७३०
८	आस्थापना ठेका	१०४५	१२१९०	१२७३८५५०
	एकूण	२६७४		३२५९६०६०

सन २०१९-२० या वित्तीय वर्षात कामाचे एकूण २६८ दिवस होते व कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागणी व १० टक्के वार्षिक वाढ विचारात घेऊन त्यानुसार सानुग्रह अनुदान प्रतिदिन रु.५०/- याप्रमाणे मंजुर झाल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.	कर्मचारी तपशिल	कर्मचारी संख्या	सानुग्रह अनुदान प्रति कर्मचारी	एकूण खर्च
१	स्थायी आस्थापना	१०४२	१३४००	१३९६२८००
२	२५६-ई फॉर्म व रोजंदारी कर्मचारी	२६	१३४००	३४८४००
३	NULM	५	१३४००	६७०००
४	क्षयरोग नियंत्रण	१७	१३४००	२२७८००
५	RCH	२४	१३४००	३२१६००
६	NUHM	४३	१३४००	५७६२००
७	महापालिकेमार्फत कंत्राटी (६महिने)	५८३	१३४००	७८१२२००
८	आस्थापना ठेका	१०६६	१३४००	१४२८४४००
	एकूण	२८०६	१०७२००	३७६००४००

सन २०१९-२० मध्ये कर्मचाऱ्यांना एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पुर्ण वर्षापर्यंत सलग सेवेच्या कालावधीसाठी यथाप्रमाणे बोनसची रक्कम अनुज्ञेय असेल. कर्मचाऱ्यांना सन २०१९-२० ह्या वित्तलब्धीवर दिपावली सन २०२० करीता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्ती वरील अधिकारी/कर्मचारी, प्रकल्प अधिकारी व समुह संघटक, ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत कर्मचारी, इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत कार्यरत कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, आस्थापना मार्फत घेतलेले कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचारी अश्या एकूण २८०६ कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२० करीतासुध्दा सानुग्रह अनुदान मंजूर करणे अपेक्षीत आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागांत तांत्रिक, प्रशासकीय व विकास कामे करण्यासाठी निविदा प्रक्रिये अंतर्गत नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित पदावरील वेतनाच्या ९०% वेतन अदा करण्याचे धोरण निश्चीत केले आहे. तसेच निवीदा धारकास मासिक बिलामधून बोनसपोटी ८.३३% या दराने रक्कम अदा केली जात नाही. तरी, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिपावली सन-२०२० करीता महानगरपालिका आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे अपेक्षीत आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात कार्यालयीन कामकाजाचे एकुण २६८ दिवस होते. तसेच जगभरात पसरलेल्या कोरोना वायरस (कोव्हीड-१९) च्या काळात सर्व कर्मचाऱ्यांनी १००% उपस्थिती नियमानुसार कार्यालयात हजर राहून कामे केली आहेत. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर १०% वाढीव दराने रु.५०/- प्रतिदिन या हिशोबाने सानुग्रह अनुदान देणेबाबत शिफारस करणेत येत आहे. महानगरपालिकेने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका आस्थापनेवरील

कर्मचाऱ्यांकरीता "महानगरपालिका कर्मचारी वर्गास बक्षिस/सानुग्रह अनुदान/बोनस" या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.३,५०,००,०००/- ची तरतुद केली आहे तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम रु.२२०९६६००/- संबंधीत कर्मचाऱ्यांना मासिक वेतन अदा करणेकामी तयार केलेल्या लेखाशिर्षातून करणेत येईल.

तरी, वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३, वर्ग-४, प्रकल्प अधिकारी व समुह संघटक, ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कर्मचारी, इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत कार्यरत कर्मचारी NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, करारपध्दतीने कार्यरत कर्मचारी व आस्थापना मार्फत घेतलेले कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना दिपावली सण २०२० करीता सानुग्रह अनुदान मंजूर करणेस प्रशासकिय व वित्तीय मंजुरीकरीता सादर करणेत आला होता. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव/निर्णय :- वसई - विरार शहर महानगपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ रोजी महानगरपालिका आस्थापनेवर किमान ६ महिन्यांचा कार्यकाल पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सन २०१९-२० करीता प्रत्यक्ष कामकाजाचे २६५ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु.४६/- किंवा प्रति कर्मचारी रु.१२१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करण्यात आली होती. महापालिका आस्थापनेवर एकूण २८०६ कर्मचारी आहेत. तरी, सन २०१९-२० मध्ये महानगरपालिका आस्थापनेवर किमान सहा महिन्यांचा कार्यकाल पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ करीता प्रत्यक्ष कामकाजाचे २६८ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु.४६/- किंवा प्रति कर्मचारी रु. १२१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करणेस तसेच ज्या कर्मचाऱ्यांना माहे मार्च २०२० मध्ये प्रत्यक्ष अदा झालेले वेतन/मानधन हे सानुग्रह अनुदानापेक्षा कमी असल्यास त्यांना माहे मार्च २०२० चे वेतनाइतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. प्रति कर्मचारी रु.१२१९०/- याप्रमाणे एकूण २८०६ कर्मचाऱ्यांकरीता रक्कम रु.३,४२,०५,१४०/- इतका खर्च होणे अपेक्षीत आहे. तरी, सन २०२० चे दिवाळी सणानिमित्त द्यावयाचे सानुग्रह अनुदानापोटी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

3/11/2020.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ४९४ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०४/११/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विरार (पू) प्रभाग समिती 'सी' बाजार वार्ड परिसरातील मनपाच्या बहुउद्देशिय इमारतीच्या खिडक्यांना लोखंडी जाळी बसविणेकामी नोंदणीकृत ठेकेदारामार्फत काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- :- सादर करणेत येते की वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमधील विरार (पू) प्रभाग समिती सी, बाजार वॉर्ड परिसरात महानगरपालिकेची G+४ बहुद्देशिय इमारत अस्तित्वात आहे. सदर इमारतीमध्ये प्रभाग समिती 'सी' कार्यालय, मुख्य वैद्यकिय व आरोग्य विभाग, मुख्य लेखा विभाग, माहिती-तंत्रज्ञान, महिला बालकल्याण, माहिती अधिकार, NULM, सामान्य प्रशासन, भांडार, सामाजिक सभागृह इ. विभाग कार्यरत आहेत. सदर इमारतीच्या खिडक्यांना लोखंडी जाळी बसविणे कामी मा.आयुक्त सो. यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

अंतभूर्त बाब	अंदाजित खर्च	ठेकेदाराचे नाव
लोखंडी जाळी अँटिकरोसिव पेंट व ऑईल पेंट सहित	रु.१०,१३,३२५/-	मे. श्री सद्गुरु कन्स्ट्रक्शन

तरी उपरोक्त काम करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता व वर नमूद केलेल्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून राज्य दरसूची नुसार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो. हयांचे मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विरार (पू) प्रभाग समिती 'सी' बाजार वार्ड परिसरातील मनपाच्या बहुउद्देशिय इमारतीच्या खिडक्यांना लोखंडी जाळी बसविणेकामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु. १०,१३,३२५/-अंदाजित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकीय मान्यता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता मनपाचे नोंदणीकृत ठेकेदार मे.श्री सद्गुरु कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत राज्य दरसूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३९५ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक :०३/११/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कामाकाजासाठी नव्याने नियुक्त केलेले मा.उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य, सार्व.आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन व सामान्य प्रशासन स्टोअर्स) हयांचे करीता दालन बनविणेकामी नोंदणीकृत ठेकेदारामार्फत काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी मा. उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य, सार्व.आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन व सामान्य प्रशासन स्टोअर्स) हयांची नियुक्ती करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने वैद्यकीय आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी मा. उपायुक्त हयांचेकरीता प्रभाग 'सी' कार्यक्षेत्रातील बाजार वॉर्ड येथील बहुउद्देशीय इमारतीमधील ३रा मजला येथे दालन व्यवस्था करुन देणेबाबतच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो. हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

अंतभूर्त बाब	अंदाजित खर्च	ठेकेदाराचे नाव
पार्टीशन,स्वच्छतागृह अॅटिचेंबर, रंगकाम, कार्पेट,पडदे, टेबल, फॉल्स सिलिंग, सोफा इ.	रु.६,३०,३३६/-	मे. शाहरुख खान

तरी उपरोक्त काम करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता व वर नमूद केलेल्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून राज्य दरसूची नुसार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो. हयांचे मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वैद्यकीय आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी मा. उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य, सार्व.आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन व सामान्य प्रशासन स्टोअर्स) हयांचेकरीता प्रभाग 'सी' कार्यक्षेत्रातील बाजार वॉर्ड येथील बहुउद्देशीय इमारतीमधील ३रा मजला येथे दालन व्यवस्था करुन देणेकामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु.६,३०,३३६/- अंदाजित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकीय मान्यता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता मनपाचे नोंदणीकृत ठेकेदार मे.शाहरुख खान यांचे मार्फत राज्य दरसूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ३९६ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक :०४/११/२०२०

प्रस्तावाचा विषय:-वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग 'सी' चंदनसार येथील चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) कोरोनाबाधीत तसेच संशायित रुग्णांकरीता विविध कामे करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी, चंदनसार येथिल चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) कोरोनाबांधित / संशयित रुग्णांकरीता सर्व सोयीयुक्त आरोग्य केंद्र उभारणे आलेले आहे. आरोग्य केंद्र उभारणेच्या दृष्टीने सदर इमारतीमध्ये खालील प्रमाणे कामे करणे आवश्यक आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नाव
१	विरार (पू.) वॉर्ड क्र.६ मध्ये चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) करीता नहानी ट्रप, कडप्पा लादी, लोखंडी ग्रील, अल्युमिनिअम दरवाजा, एसीपी पार्टीशन, नळ, सिंक, स्लायडींग गेट, जिप्सम प्लास्टर, रंगकाम, पी.ओ.पी, स्टेनलेस स्टील सिंक व इतर विदयुतीची कामे करणे.	रु.१,००,४७,८७८/-	मे.गजानन कंन्स्ट्रक्शन

ठराव :- सबब उपरोक्त वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी, चंदनसार मधील कोरोना (Covid-१९) हॉस्पीटल येथे बांधकाम संबंधित विविध कामे करणेकामी रक्कम रु.१,००,४७,८७८/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची -ड, प्रकरण -५ संविदा २(२) नुसार मे.गजानन कंस्ट्रक्शन हयांना कार्यादेश देण्यास मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.-४०१३०५
दुरध्वनी - ०२५-२५२५११०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५११०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८७

विभाग : DAY-NULM
दिनांक :-४/११/२०२०

प्रस्तावाचा विषय :- आपुलकी शहरी बेघर स्वंयसहाय्यता गटाने निवारा केंद्रात पुरविण्यात आलेल्या चहा, नाश्ता, दोन वेळचे जेवण याकरीता झालेल्या खर्चास व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत दि.१२/११/२०१७ रोजी विराट नगर, विरार प. येथे बेघर व्यक्तींकरीता निवारा केंद्र सुरू करण्यात आले आहे. सदर निवारा केंद्राची क्षमता ४० ते ११० इतकी असून बेघर व्यक्ती ये-जा करीत असतात परंतू तेथे कायम स्वरूपी ५५ व्यक्ती आहेत दोन वेळेसचे चहा, नास्ता जेवण हे ई-निविदा धारक मे.एच.आर.इंटरप्रायझेस व मे.एसीई इंटरप्रायझेस यांच्या कडून पुरवठा करण्यात येत होता. पुरवठा धारकाचा कालावधी हा दिनांक ३१ मार्च २०२० रोजी पर्यंत होता त्यानंतर मुदत वाढ करीता टिपणी सादर करण्यात आली होती त्या अनुषंगाने मा.आयुक्त यांच्या सोबत दिनांक २८/०५/२०२० रोजी झालेल्या चर्चेनुसार शहरी बेघर केंद्रातील व्यक्तींचे सबळीकरण व सक्षमीकरण व्हावे यासाठी शहरी बेघर व्यक्तींचा स्वंयसहाय्यता गट काढून त्यांनाच जेवण, चहा, नाश्ता बनविण्याचे काम देण्यात यावे असे मा.आयूक्त यांनी सुचीत केले आहे.

त्या अनुषंगाने आपुलकी शहरी बेघर स्वंयसहाय्यता गट स्थापन करण्यात आला. व आपुलकी स्वंयसहाय्यता गटाला दि.२२/०६/२०२० रोजी दोन वेळा जेवण, चहा व नाश्ता बनविण्याचे काम देण्यात आले. व त्या करीता गटाला ५५ व्यक्ती करीता ११६१००/- (अक्षरी एक लाख सोळा हजार शंभर रूपये मात्र) अग्रीम रक्कम देण्यात आली व ५००० रू. या प्रमाणे ५ व्यक्तींकरीता स्वंयपाक बनविण्याकरीता मानधन प्रति महा २५०००/- रू. देण्यात आले.सदर खर्च २२/०६/२०२० जुन ते ३१ जुलै पर्यंत एकूण रक्कम १४७७६६/- रू. झालेला आहे. तसेच १ ऑगस्ट ते ३१ मार्च २०२० पर्यंत शहरी बेघर व्यक्ती च्या जेवण चहा, नाश्ता यावर पुढील ८ महिन्या करीता १३ लाख रूपये अंदाजीत खर्च होणारा आहे. माहे जुन मध्ये मा.स्थायी सभा झाली नसल्यामुळे मा.स्थायी सभेपुढे सदर विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतली नाही. त्यामुळे सदर आपुलकी शहरी बेघर स्वंयसहाय्यता गटाला दिलेल्या अग्रीम रक्कम व होणाऱ्या अंदाजीत खर्च १३ लक्ष सदर खर्च प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर आपुलकी शहरी बेघर स्वंयसहाय्यता गटाला दि.२२/०६/२०२० ला दोन वेळा जेवण, चहा, नाश्ता या करीता पुरविठा आदेश दिला आहे. त्या अनुषंगाने आपुलकी शहरी बेघर स्वंयसहाय्यता गटाला जून ते जुलै पर्यंत एकूण रक्कम ११६१००/- (अक्षरी एक लाख सोळा हजार शंभर रूपये मात्र) रक्कम देण्यात आली त्याचप्रमाणे ५०००/- रू या प्रमाणे ५ व्यक्ती करीता स्वंयपाक बनविण्याकरीता मानधन प्रति महा २५०००/- रू. देण्यात आले. त्या करीता माहे जुन ते जुलै पर्यंत एकूण रक्कम १४७७६६१/- रू. खर्च झाला आहे. तसेच १ ऑगस्ट ते ३१ मार्च २०२० या कलावधीत शहरी बेघर निवारा केंद्रातील ५७ व्यक्तींपेक्षा कमी किंवा जास्त व्यक्तींकरीता ७० रू. या प्रमाणे दोन वेळा जेवण, चहा, नाश्ता तसेच मानधन आपुलकी शहरी बेघर स्वंयसहाय्यता गटाला मानधन देणे आवश्यक आहे. यावर पुढील आठ महिन्या करीता १३ लक्ष (तेरा लक्ष) रूपये अंदाजीत खर्च होणार आहे. तसेच माहे १ ऑगस्ट ते २० ऑक्टोंबर पर्यत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. सदर खर्च शहरी बेघरांसाठी दैनदीन महसुली खर्च या लेखाशिर्षका मधुन करता येईल. याबाबत महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार शहरी बेघर व्यक्तींकरीता दोन वेळा जेवण, चहा, नाश्ता व आपुलकी शहरी बेघर गटाचे मानधन या करीता होणारा १३,००,०००/- रू. (अक्षरी तेरा लाख रूपये मात्र) रक्कम खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतादेण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 19/10
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.-४०१३०५
दुरध्वनी - ०२५-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३९८ विभाग : DAY-NULM
दिनांक :-६/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका शहरी बेघरांच्या निवारा केंद्र (विराटनगर विरार प.) येथे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता चहा, नास्ता व जेवण इ. साहीत्य पुरवठा करणेसाठी सन २०१९-२० मधील मंजुर पुरवठाकारास मुदतवाढ मिळणे बाबत..

प्रस्तावाचा मजकुर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांसाठी निवारा या उपांगा मार्फत नागरी गरीब बेघरांना मुलभूत सोयी व सुविधा पुरविणे, पाणी, स्वच्छता, सुरक्षितता, लाईट इ. सेवा या कायमस्वरूपी निवारा केंद्रात उपलब्ध करून देण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लहान मुल महिला, वयोवृध्द व्यक्ती, अपंग व्यक्ती, आजारी व्यक्तींना निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देण्यात येते.

शहरी बेघरांना निवारा केंद्र या उपांगा अंतर्गत विराट नगर, विरार (प.) येथे तात्पुरता स्वरूपाचे शहरी निवारा केंद्र स्थापन करण्यात आलेले असून, त्या ठिकाणी अंदाजित एकूण ६० व्यक्तींना निवारा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. निराधार व्यक्तींना चहापान व्यवस्था, अल्पोपहार, भोजन इ. पुरवठा करावा लागतो. सदर खर्च हा कायमस्वरूपी होणार असल्यामुळे मा.आयुक्त सो. यांनी संदर्भ क्र.३ नुसार दि.०३/०८/२०१९ रोजी ई निवीदा प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी मान्यता देण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई निवीदा प्रक्रिया पुर्ण करून संदर्भ क्र.४ नुसार मागविण्यात आलेले दर व त्यावर होणाऱ्या खर्चास मा.स्थायी समितीची मंजुरी तसेच होणाऱ्या प्रशासकीय व वित्तीय खर्चास मंजुरी घेण्यात आली होती.

दिलेल्या आदेशानुसार मे.एच आर इंटरप्रायझेस यांना बेघर निवारा केंद्रात चहा, नास्ता व जेवण इ. साहित्य पुरवठज्ञ करण्याचे आदेशीत करण्यात आले होते. तसेच पुरवठा दाराच्या आदेशा नुसार मे. एसीई इंटरप्रायझेस यांना बेघर निवारा केंद्रात नास्ता व जेवण इ. साहित्य पुरवठा करण्याचे आदेशीत करण्यात आले होते. संबधीत पुरवठाकारांना उपरोक्तप्रमाणे बेघर निवारा केंद्रत सुविधा पुरविण्याचा कालावधी ३१ मार्च २०२० रोजी संपत आहे. तसेच शहरी बेघर निवाराकेंद्रात होणारा खर्च हा शहरी बेघरांसाठी दैंनदिन महसूली खर्च या लेखाशिर्षातून करण्यात येतो. या घटकांवर दिनांक २० सप्टेंबर २०१९ ते दिनांक २९ फेब्रूवारी २०२० पर्यंत एकूण ११.३५ लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

बेघर निवारा केंद्रात सुविधा पुरविण्याचा कालावधी ३१ मार्च २०२० रोजी संपत असल्यामुळे सन २०२०-२१ वित्तीय वर्षाकरीता नव्याने ई निविदा मागविणे कामी कार्यालयीन टिपणी टाकण्यात आलेली आहे. परंतु माहे मे - जुन २०२० मध्ये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक असल्याने आचार संहिता लागण्याची शक्यता लक्षात घेता तसेच बेघर निवारा केंद्रात राहणारे शहरी गरीब व्यक्तींना चहा, नास्ता व जेवण इ. सुविधेपासुन वंचीत ठेवता येणे योग्य राहणार नाही करीता सन २०१९-२० मधील मंजुर पुरवठाकारांकडून पुर्वीच्या मंजुर दराप्रमाणे नविन ई निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत पुर्वीच्या मंजुर दराप्रमाणे मुदतवाढ देणे योग्य होईल असे वाटते जेणेकरून बेघर निवाराकेंद्रातील शहरी बेघर व्यक्तींना उपासमारीची वेळ येणार नाही.

तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या शहरी बेघरांच्या निवारा केंद्राकरीता सन २०२०-२१ या वित्तीय वर्षा करीता चहा, नास्ता व जेवण इ. पुरवठा करणेकामी सन २०२०-२१

या वित्तीय वर्षा करीता ई निविदा करणेस व त्याकामी येणाऱ्या रू. ७०.०० लक्ष रक्कमेय प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्यास विनंती असून सन २०१९-२० मधील निविदा संपुष्टात येणार असल्याणे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाची ई निविदा प्रक्रिया अंतिम करण्या अभावी निवारा केंद्रातील बेघर व्यक्तींना देण्यात येणाऱ्या चहा, नास्ता व जेवण इ. सुविधा पुरविण्याच्या प्रक्रियेस खंड पडू नये म्हणून मे.एच आर इंटरप्रायझेस यांना सन २०१९-२० मधील पुर्वीच्या मंजुर दराप्रमाणे नविन ई निविदा पुर्ण होई पर्यंत मुदतवाढीचा कार्यादेश देणे बाबत मा.स्थायी समिती सभेपुढे मंजूरी मिळणे व होणाऱ्या प्रशासकीय व वित्तीय खर्चास मान्यता मिळणेकामी पुढील आदेशास्तव सविनय सादर.

ठराव :- शहरी बेघर निवारा केंद्रातील बेघर व्यक्तींना दोन वेळेस जेवण, चहा, नास्ता पुरविण्याचा कालावधी ३ मार्च २०२० रोजी संपुष्टात आल्याने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता नव्याने ई-निविदा मागविन्या बाबत कार्यालयीन प्रक्रीया सुरू आहे. शहरी बेघर व्यक्ती चहा, नास्ता, जेवण ई. सुविधांपासून वंचित ठेवता येणार नाही. करीता सन २०१९-२० मधिल मंजुर पुरवठादाराकडून पुर्वीच्या मंजुर दरा प्रमाणे नविन निविदा किंवा पुढील आदेशीत होईपर्यंत पुर्विच्या मंजुर दराप्रमाणे पुरवठा करून घेण्यात आलेला आहे..

या करीता अंदाजीत रक्कम ७,३५,०००/- रू. माहे एप्रिल ते जून २०२० पर्यंत झाला आहे. सदर खर्च लेखाशिर्षक शहरी दैनदीन शहरी महसुली खर्च या मधून मे.एच.आर. इंटरप्रायझेस व मे.एसीई इंटरप्रायझेस यांना सन २०१९-२० मधील पुर्विच्या मंजुर दराप्रमाणे देण्यास महानगरपालिका कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार शहरी बेघर व्यक्तींच्या जेवण, चहा, नास्ता या करीता येणाऱ्या रक्कम रू.७,३५,०००/- (अक्षरी सात लाख एकोणीस हजार सातशे बहात्तर रूपये मात्र) झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येते आहे.

आयुक्त तथा प्रशासक 9/11/2020
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०२/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७

ई-मेल Vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३९९ विभाग : आस्थापना (मु.)

दिनांक : ०४/११/२०२०

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिकेतील स्थायी कर्मचा-यांना सण अग्रिम रक्कम अदा करणे बाबत....

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम-२०१५/प्र.क्र.५७/१५/विनियम, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ नुसार दिनांक १ जानेवारी, २००६ सुधारित करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील शासकीय कर्मचा-यांचे ग्रेड वेतन रु. ४,८००/- (रुपये चार हजार आठशे मात्र) पेक्षा अधिक नाही अशा शासकीय कर्मचा-यांना रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) सण अग्रिम अनुज्ञेय होता.

सण अग्रिम फक्त खालील सणांना तसेच सामान्य प्रशासन विभागकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणा-या सणांसाठीच अनुज्ञेय आहे.

१. दिवाळी	६. रोश-होशना
२. रमजान ईद	७. वैशाख्री पौणिमा (भगवान बुद्ध जयंती)
३. ख्रिसमस	८. स्वातंत्र दिन
४. पारसी नववर्ष	९. प्रजासत्ताक दिन
५. संवत्सरी	१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

तसेच शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७/विनियम, दिनांक १८ मे, २०१७ नुसार सदर निर्णयामध्ये सणांच्या यादीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करण्यात आलेला आहे व शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम-२०१८/प्र.क्र.३७/१८/विनियम, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ नुसार कर्मचा-यांना सण अग्रिमाची रक्कम रु. १०,०००/- वरुन रु. १२,५००/- (रुपये बारा हजार पाचशे फक्त) इतकी वाढविण्यात आलेली असून, शासकीय कर्मचा-यांचे ग्रेड वेतन रु. ४,८००/- (रुपये चार हजार आठशे मात्र) पेक्षा अधिक नाही अशा शासकीय कर्मचा-यांना सण अग्रिम अनुज्ञेय आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना सन २०१९-२० या वित्तीय वर्षामध्ये दिवाळी सणानिमित्त सण अग्रिम रु. १२,५००/- (रुपये बारा हजार पाचशे मात्र) अदा करण्यात आलेले होते. त्यानुसार सदर कर्मचा-यांकडून १० समान हप्त्यात सदरची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना सण अग्रिम रु. १२,५००/- मंजूर झाल्यास सदर कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून १० समान हप्त्यात रक्कम वसुल करण्यात येईल.

तरी, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षामधील दिवाळी सणानिमित्ताने सण अग्रिम रक्कम रु. १२,५००/- अदा होणेस मा. प्रशासक तथा आयुक्त यांचेकडे सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

ठराव :- शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम-२०१५/प्र.क्र.५७/१५/विनियम, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ नुसार दिनांक १ जानेवारी, २००६ सुधारित करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील शासकीय कर्मचा-यांचे ग्रेड वेतन रु. ४,८००/- (रुपये चार हजार आठशे मात्र) पेक्षा अधिक नाही अशा शासकीय कर्मचा-यांना रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) सण अग्रिम अनुज्ञेय होता.

सण अग्रिम फक्त खालील सणांना तसेच सामान्य प्रशासन विभागकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणा-या सणांसाठीच अनुज्ञेय आहे.

१. दिवाळी	६. रोश-होशना
२. रमजान ईद	७. वैशाखी पौणिमा (भगवान बुद्ध जयंती)
३. ख्रिसमस	८. स्वातंत्र दिन
४. पारसी नववर्ष	९. प्रजासत्ताक दिन
५. संवत्सरी	१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

तसेच शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७/विनियम, दिनांक १८ मे, २०१७ नुसार सदर निर्णयामध्ये सणांच्या यादीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करण्यात आलेला आहे व शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम-२०१८/प्र.क्र.३७/१८/विनियम, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ नुसार कर्मचा-यांना सण अग्रिमाची रक्कम रु. १०,०००/- वरुन रु. १२,५००/- (रुपये बारा हजार पाचशे फक्त) इतकी वाढविण्यात आलेली असून, शासकीय कर्मचा-यांचे ग्रेड वेतन रु. ४,८००/- (रुपये चार हजार आठशे मात्र) पेक्षा अधिक नाही अशा शासकीय कर्मचा-यांना सण अग्रिम अनुज्ञेय आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना सण अग्रिम रु. १२,५००/- मंजूर करण्यात येत आहे. जे कर्मचारी सण अग्रिम रक्कम घेतील त्या कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून १० समान हप्त्यात रक्कम वसुल करण्यात यावी.

तरी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार सन २०२० च्या दिवाळी सणानिमित्त द्यावयाचे सण अग्रिम रक्कम रु. १२,५००/- (अक्षरी - रु. बारा हजार पाचशे मात्र) अदा करणेस तसेच होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 4/11/2020

वसई विरार शहर महानगरपालिका

E:\Siddhi\Tipani.docx\27

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २००

विभाग: भांडार विभाग
दिनांक :०४/११/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी Hp Laser १०८ A चे प्रिंटर्स टोनर खरेदी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकमा अंतर्गत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत Hp Laser १०८ A चे प्रिंटर्स खरेदी करण्यात आलेले आहे. सदर प्रिंटर्स करिता लागणारे टोनर मिळणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागाने २३/०९/२०२० रोजीच्या टिपणीनूसार ३० नग प्रिंटर्स टोनर व रिफीलिंग करणेबाबत मागणी केलेली आहे.
त्यानुसार भांडार विभागामार्फत Hp Laser १०८ A चे प्रिंटर्स टोनर खरेदी करण्याकामी मा.उपायुक्त साो. हयांच्या मंजुरीनुसार दि. १२/१०/२०२० रोजी दरपत्रके काढण्यात आलेली आहेत. त्यानुसार विहीत मुदतीत एकुण ८ (आठ) निविदाकारांनी भाग घेतलेला होता.

तरी प्राप्त दरामध्ये बहुचर ट्रेडर्स यांच्या दर तुलनात्मक कमी आहे. परंतु ते HP कंपनीचे अधिकृत विक्रेते आहे हयाचा कोणताही खुलासा नाही. तसेच पुरवठादार कृष्णा इंटरप्रायजेस हे Hp कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत व त्यांचा दर सर्वकरासहित प्रती नग रक्कम रु ३६५८ इतका आहे. त्यामुळे कमी दराचे पुरवठादार योग्य माल देतील याबाबत सांशकता आहे.

सदर कंपनीचे Hp Laser १०८ A मॉडल हे नव्याने बाजारामध्ये आलेले असून कंपनीने या टोनरसाठी रिफीलिंगची व्यवस्था केलेली नाही. वापर झाल्यानंतर रिफीलिंग करुन पुर्नवापर करता येत नसल्याने प्रत्येकवेळी नव्याने टोनर खरेदी करावा लागणार आहे व त्यावर होणारा खर्च मोठया प्रमाणावर होणार आहे. त्याकरिता सदर प्रिंटर्सचा वापर कमी होणाऱ्या ठिकाणी केल्यास आर्थिक बचत होईल.

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील माहिती तंत्रज्ञान विभाग (संगणक कक्ष) अंतर्गत माहिती तंत्रज्ञान विभाग संगणक खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त दरपत्रक रद्द करण्यात आली असून GEM पोर्टवरुन टोनर खरेदी केल्यास त्याचा दर रक्कम रु. ३५२१/- प्रति नग असा आहे. तरी GEM पोर्टलवरुन ५० नग टोनर खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रु. १,७६,०५०/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव:- सदर Hp Laser १०८ A मॉडल टोनर व्यवस्था वसई-विरार शहर महानगरपालिका दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी पुरवठा करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार GEM पोर्टलवरुन मागविण्यास येणाऱ्या रक्कम रु. १,७६,०५०/- (अक्षरी एक लक्ष शहात्तर हजार पन्नास मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. -२०१ विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ०४/१९/२०२०

प्रस्तवाचा विषय - वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती बी, तुळींज, विजय नगर हॉस्पीटल येथे पाणीपुरवठा कामी जलशुध्दीकरण यंत्र (R.O. Water Purification System), 4 वॉटर कुलर पुरविणे, बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे करणे बाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकिय वित्तीय मान्यता देणे व मंजुर वार्षिक निविदा धारकास कार्यादेश देणे साठी सादर.

प्रस्तवाचा मजकूर- सादर करणेत येते की देशभरात कोरोना (Covid-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. याकरीता, त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी आवश्यक त्या योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्या अंतर्गत प्रभाग समिती बी येथील तुळींज, विजय नगर हॉस्पीटल कार्यक्षेत्रामध्ये कोरोना संशयीत रुग्णंच्या प्रथमोपचारासाठी व हॉस्पीटील मध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णान व नागरीकांकरीता इमारतीमध्ये पीण्याच्या पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नसल्याने उपचाराकरीता येणा-या रुग्णांना व नागरीकांना पाणीपुरवठयाची अडचण येत आहेत. याकरीता तुळींज, विजय नगर हॉस्पीटल मध्ये तातडीने पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. तुळींज, विजय नगर हॉस्पीटल मध्ये मा. आयुक्त सा ो. यांनी भेटी दरम्यान जलशुध्दीकरण यंत्र (R.O. Water Purification System), 4 वॉटर कुलर पुरविणे, बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे करणेबाबत आदेशीत केले होते.

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नांव
१	तुळींज, विजय नगर हॉस्पीटल मध्ये जलशुध्दीकरण यंत्र (R.O. Water Purification System) पुरविणे, बसविणे	रु.2,40,720/-	मे. संजय कंन्स्ट्रक्शन
2	तुळींज, विजय नगर हॉस्पीटल मध्ये 4 वॉटर कुलर पुरविणे, बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे	रु.1,60,000/-	मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस
	एकुण	रु.4,00,720/-	

तुळींज, विजय नगर हॉस्पीटल मध्ये पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध होणेकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,००,७२०/- इतका होणार आहे. पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड प्रकरण-५ संविदा २(२) नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन शासनाच्या दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदापत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव- वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती बी, तुळींज विजय नगर हॉस्पीटल येथे पाणीपुरवठा कामी १ जलशुध्दीकरण यंत्र (R.O. Water Purification System),व इतर सलग्न किरकोळ कामे करणे कामी रक्कम रु. २,४०,७२०/- व ४ वॉटर कुलर पुरविणे, बसविणे कामी रक्कम रु.१,६०,०००/- या दोन्ही कामाच्या अंदाजपत्रकातीय एकुण रक्कम रु.४,००,७२०/- इतकी आहे. सदर दोन्ही कामाच्या दरात १०% कमी दरानी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम अनुसुची -ड प्रकरण -५ संविदा २(२) नुसार मे. संजय कंन्स्ट्रकशन, विरार (प.) व मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस, विरार(पुर्व) यांच्या संविदा करून कार्यादेश देण्यास मंजुरी असे.

मा. आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

o/c

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २०२

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ०६/६९/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तिय वर्षांकरिता आवश्यकते प्रमाणे रुग्णालयातील "वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे" या कामीची ई-निविदा प्रसिध्द करुन दर मागविणेकामी प्रशासकिय मंजूरी व सदर कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास वित्तिय मंजूरी मिळणेच्या मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचे २ रुग्णालये, २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ९ दवाखाने, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ कोवीड रुग्णालये यांचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. रुग्णालयीन विभागाच्या दैनंदिन कामकाजासाठी वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक असते. सदर बाबींची पुर्तता करण्याकरीता ई-निविदा मंजुर आहेत. संबंधित निविदेतून देखभाल दुरुस्ती सेवा पुरविण्यात येत होती. परंतू मंजूर निविदाधारक यांचेकडून सदर सेवा नियमितपणे पुरविली न गेल्यामुळे रुग्णालयीन कामकाजात गैरसोय निर्माण होत असल्याने संदर्भिय मंजूर टिपणीनुसार संबंधितकामीची ई-निविदा प्रक्रिया नव्याने करण्याचे मा.आयुक्त यांच्याकडून निर्देश प्राप्त झाले आहेत. सदरची बाब अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने त्वरीत ई-निविदा प्रक्रिया करणे गरजेचे आहे. जेणेकरुन रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये गैरसोय होणे टाळता येईल. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	तपशिल	सन २०२०-२१ ची अर्थसंकल्पिय तरतुद व खर्चाची रक्कम	सन २०२१-२०२२ (प्रस्तावित अपेक्षित अर्थसंकल्पिय तरतुद व खर्चाची रक्कम)	सन २०२२-२०२३ (प्रस्तावित अपेक्षित अर्थसंकल्पिय तरतुद व खर्चाची रक्कम)
१	२	३	४	५
१	वसई विरार शहर महानगरपालिकेची विविध रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, माताबाल संगोपन केंद्रे, कोवीड रुग्णालय व दवाखाने येथिल वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे यांची देखभाल दुरुस्ती करणे	ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींग सह अन्य रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती रु.५,००,००,०००/- मधील रु.२५,००,०००/-	ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींग सह अन्य रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती- रु.६,००,००,०००/- मधील रु.५०,००,०००/-	ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींग सह अन्य रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती- रु.७,००,००,०००/- मधील रु.६०,००,०००/-

उपरोक्त तक्यानुसार सदर प्रस्तावामध्ये सन २०२०-२१, २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या त्रेवार्षिकाकरीता वित्तिय वर्षनिहाय व लेखाशिर्षाअंतर्गत केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने रुग्णालयातील वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करून दर मागविणेकामी प्रशासकिय मंजूरी मिळणेस व सदर कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास वित्तिय मंजूरी मिळणेच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तिय वर्षांकरिता आवश्यकते प्रमाणे रुग्णालयातील वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे वार्षिक पध्दतीने साहित्यासह व साहित्याविना देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करून दर मागविणेकामी आवश्यक प्रक्रिया करून संविदा करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी) 6/11/2022
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २०३ विभाग:- विद्युत विभाग
दिनांक:-०६/ ४९/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वॉर्ड क्र. ९२ नवघर पूर्व विभागात पथदिव्यांसाठी केबलींग काम करणे.

प्रस्तावाचा मजकुर:- वसई विरार शहर महानगरपालिका आचोळा "ड" प्रभागात वॉर्ड क्र.९२ नवघर पुर्व विभागात पथदिव्यांसाठी केबलींग काम करणेस मा.अतिरिक्त आयुक्त सो .यांनी आदेशित केले आहे.सदरकामी जिल्हादर सुची २०१९-२० नुसार रक्कम.रु .६,९०,६११/- खर्च अपेक्षित आहे.

मुळ तरतूद :- रु .१२,००,००,०००/-
यापुर्वीचा खर्च :- रु .१,९६,८४५/-
प्रस्तावित खर्च : - रु. ६,९०,६११/-
उपलब्ध शिल्लक :- रु .११,९१,१२,५४४/-

नियंत्रण नोंद वही पृ.क्र ०५ अ.क्र. २ वर नोंद घेतली आहे.

सबब उपरोक्त नमूद ठिकाणी तातडीने पथदिव्यांची केबलींग व इतर किरकोळ काम करणे कामी येणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाज पत्रकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणाली द्वारे निविदा दर मागविणे कामाचा प्रस्ताव आपल्या मंजुरीस्तव सादर.

ठराव: वसई विरार शहर महानगरपालिका आचोळा "ड" प्रभागात वॉर्ड क्र.९२ नवघर पुर्व औद्योगिक परिसर ,रामदास नगर ,संत जलाराम नगर,संत जलाराम बापू नगर, आझाद नगर परिसराती पथदिव्यांच्या निकामी केबल बदली करणे व इतर किरकोळ विद्युतीय काम करणेकामी होणाऱ्या रक्कम.रु. ६,९०,६११/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाज पत्रकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 6/11
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं ४०१३०५
दुरध्वनी- ०२५०-२५२५१०/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २०४

विभाग : विद्युत
दिनांक: ०६/११/२०२०

प्रस्तावाचा विषय :- नवघर पूर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात इन्व्हर्टर वॅटरी बसविणे व इलेक्ट्रीफिकेशन काम करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आचोळा डी प्रभागात नवघर पूर्व येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात विजपुरवठा करणेकामी इन्व्हर्टर, वॅटरी बसवून इतर किरकोळ विद्युतीय काम करून घेणेस मा. अतिरीक्त आयुक्त सो. यांनी आदेशित केले आहे सदरकामी जिल्हादर सुची २०१९-२० नुसार र.रु. १९६८४५/- खर्च अपेक्षित आहे.

मूळ तरतुद :-

यापुर्वीचा खर्च :-

प्रस्तावित खर्च :-

उपलब्ध शिल्लक :-

नियंत्रण नोंद वही पृ.क्र. ६३ अ.क्र. .... वर नोंद घेतली आहे.

सबब उपरोक्त नमूद ठीकाणी तातडीने इन्व्हर्टर-वॅटरी बसवून व इतर आवश्यक विद्युतीय काम करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३)(क) अन्वये मा. अयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाज पत्रकीय रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणाली द्वारे निविदा दर मागविणे कामाचा प्रस्ताव आपल्या मंजुरीस्तव सादर,

